पुराव्यावर आधारीत प्रकल्प संनियत्रंण प्रणाली (Evidence Based Project Monitoring System) **विकसित करण्याच्या अनुषंगाने** KPMG Ltd **या संस्थेच्या नियुक्तीस दि. ३१/०१/२०१८ पर्यंत मुदतवाढीबाबत.**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : माविका-२०१६/प्र.क्र. १५/१४१८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - ३० डिसेंबर, २०१७

वाचा :

१. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. एफएनएस का.१४२६/प्र.क्र. १४२/३३०५, दि. १८ ऑक्टोबर, २००६
२. सामान्य प्रशासन विभाग, (माहिती तंत्रज्ञान संचालनालय), शासन निर्णय क्रमांक:
GAD-मातंसं ०८०/४/२०१४-% DIRECTORATE of IT-DIT(MH), दि.१ जुलै, २०१४.
३. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. : असांस१३१४/ /प्र.क्र.१२८/ का.-१४१, दि.३० मार्च, २०१६
४. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे आदेश क्र. पीएमएस-२०१६/सल्लानि/२९/इआसं/१०५१, दि. २९ नोव्हेंबर,२०१६
५. नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. माविका-२०१६/प्र.क्र. १५/१४१८, दि. ८ मार्च, २०१७
६. नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. माविका-२०१६/प्र.क्र. १५/१४१८, दि. १८ जुलै, २०१७
७. सा.प्र. विभाग (माहिती तंत्रज्ञान विभाग), शासन निर्णय क्रमांक: मातंसं -१७१७/प्र.क्र. १११/३९ दि.२४ मार्च, १७.
८. माहिती तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक:
GAD-मातंसं ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE of IT-DIT(MH), दि. ९ ऑक्टोबर, २०१७.
९. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे पत्र क्र. पीएमएस-२०१६/सल्लानि/२९/इआसं/८४०,दि. १५ डिंसेबर,२०१७
१०. नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. माविका-२०१६/प्र.क्र. १५/१४१८, दि. २९ सप्टेंबर, २०१७

प्रस्तावना :

अर्थसंकल्पीय योजनांसाठी एव्हिडंस बेस्ड् फोटोग्राफीद्वारे संनियंत्रण प्रणाली(EBPMS) विकसित करण्याबाबतच्या कार्यवाहीचा भाग म्हणून प्रथमत: पथदर्शी प्रकल्प म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व वस्त्रोद्योग विभाग (रेशीम उद्योग) या विभागांसाठी सदर प्रणाली अर्थ व सांख्यिकी संचालनालय, संबंधित प्रशासकीय विभाग व महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर येथील तज्ञ अधिकाऱ्यांच्या सहकार्याने विकसित करण्यात येत आहे. ही प्रक्रिया अंतिम करण्यासाठी तसेच मंत्रालयीन उर्वरित इतर विभागांसाठी ही प्रणाली विकसित करण्याच्या दृष्टीने त्या विभागात सध्या अस्तित्वात/कार्यरत असलेल्या प्रणालींचा अभ्यास करुन व ज्या विभागात प्रणाली उपलब्ध नाही त्या विभागांच्या कामकाजाचा / कार्यक्रम कार्यान्वयनाचा अभ्यास करुन प्रकल्प अहवाल तयार करणे व अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी उपरोक्त संदर्भिय (५) अन्वये KPMG Limited यांच्याकडून Principal Consultant (०.५ पदे Part Time), Senior Consultant (२ पदे) व Consultant (२ पदे) यांच्या सेवा प्रथमत: सहा महिन्यासाठी घेण्यास शासन

मान्यता देण्यात आली आहे. सदर पदांवर प्रथम ३ महिन्यांसाठी नियुक्ती करुन संदर्भिय(४) च्या आदेशान्वये गठीत मूल्यमापन समितीने कामांचे मूल्यमापन करुन मुदतवाढीबाबत निर्णय घेण्यात यावा, असे उपरोल्लेखित शासन निर्णयामध्ये नमूद आहे. त्यानुसार संदर्भिय (६) अन्वये मूल्यमापन समितीने केलेल्या शिफारसीनुसार KPMG Limited यांचेकडून सल्लागार यांच्या सेवा घेण्यास पुढील ३ महिन्याची मूदतवाढ देण्यात आली.

२. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि.०९/१०/२०१७ च्या शासन निर्णयान्वये Empanelment of Consultants ना ३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ दिली असून, सल्लागारां ची सेवा दि. ३१/०३/२०१८ रोजी अथवा तत्पूर्वी समाप्त होणे आवश्यक आहे व सदर बाब दि.३०/६/२०१७ पूर्वी निर्गमीत केलेल्या अथवा दि.३०/९/२०१७ पर्यंत निर्गमित व्हावयाच्या कार्यारंभ आदेशास लागू राहणार असल्याचे सदर शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे. KPMG Limited यांची नियुक्ती ३०/६/२०१७ पूर्वी म्हणजेच दि.२१/३/२०१७ च्या कार्यारंभ आदेशान्वये झाली असून त्यांना दिलेली मुदतवाढीचा कालावधी दि.३०/१२/२०१७ रोजी संपुष्टात येत आहे.

३. सद्य:स्थितीत EBPMS साठी सल्लागार नियुक्ती संदर्भातील Request for Proposal (RFP) मधील सल्लागार संस्थेने करावयाची तांत्रिक स्वरुपाची कामे (Technical Scope) व या अनुषंगाने कार्यमर्यादेतील महत्त्वाच्या उद्दीष्टानुसार (Key Deliverables) KPMG Limited यांनी ‘टप्पा १ A’ मधील ‘As-Is-Report’ व ‘To-be-Report (BPR) ’ वगळता उर्वरीत कामे व ‘टप्पा १ B’ मधील कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. तसेच ‘टप्पा १ C’ मधील ‘System Integrator’ नियुक्तीसाठी ‘RFP’ अंतिम करणे व त्या बाबतच्या निविदा प्रक्रियेचे व्यवस्थापन ही कामे सुरु होऊ शकलेली नाहीत. यामुळे ‘System Integrator’ ने तयार केलेल्या ‘SRS Documents’ चा आढावा घेणे, प्रणालीसाठी निश्चिती केलेल्या हार्डवेअर(Hardware) व पॅकेज सॉफ्टवेअर(Package Software) याबाबत मूल्यमापन करणे ही ‘टप्पा १ C’ मधील कामे होऊ शकलेली नाहीत.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता सदर कामे पूर्ण करण्यासाठी KPMG Limited यांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय :

EBPMS या संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या KPMG Limited या संस्थेस सल्लागार नियुक्ती संदर्भातील ‘Request for Proposal (RFP)’ मधील सल्लागार संस्थेने करावयाची तांत्रिक स्वरुपाची कामे (Technical Scope) व या अनुषंगाने कालमर्यादेतील महत्त्वाच्या उद्दीष्टानुसार (Key Deliverables) प्रलंबित कामे पूर्ण करणेकरीता KPMG Limited यांना प्रथमत: दि. ३१ /०१/२०१८ पर्यंत १ महिन्याच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे. या कालावधीकरीता

पूर्वीप्रमाणेच मनुष्यबळाची सेवा घेण्यात यावी. तथापि, १ महिन्याच्या कालावधी अखेरीस कामांचे मूल्यमापन करुन आवश्यकतेनुसार दि. ३१/०३/२०१८ पर्यंतच्या पुढील मुदतवाढ तसेच मनुष्यबळाची सेवा कमी करण्याबाबत मूल्यमापन समिती (Evaluation Committee) स्तरावर निर्णय घेण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२३०११४२२३२८१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.01.19 15:39:45 +05'30'

(वि.फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री(वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/ विधान परिषद), महाराष्ट्र राज्ययांचे खाजगी सचिव
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
७) संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, व्हीएनआयटी कॉलेज परिसर,दक्षिण अंबाझरी रोड, नागपूर-४४०००१.
८) उप महासंचालक, नॅशनल इन्फोर्मेटीक्स सेंटर, पुणे
९) संचालक ,अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
१०) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा - पूर्व, मुंबई-५१
११) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) नियोजन विभागातील सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव
१३) निवड नस्ती (का.१४१८), नियोजन विभाग. मंत्रालय, मुंबई-३२.